# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतनाच्या बाजुला, उस्मानपुरा
औरंगाबाद - ४३१ ००५, पत्र पेटी क्र -५१६
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com


**::चौकशी प्राध्यान्य/महत्त्वाचे ::**

जा.क्र.विकाऔ/आस्था-१/२०१७/ २२७८
दिनांक :- 16 JUN 2017

प्रति,
**प्राचार्य,**
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद
**प्राचार्य,**
सर्व शासकीय तंत्रनिकेतने,
औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/पु.ला.शा.तं.लातूर/शा.नि.म.तं.नि.लातूर

**विषय**:-कंत्राटी अध्यापकांच्या नियुक्ती/सेवा नियमित करण्याबाबतची चौकशी...

**संदर्भ**:-०१.मा.संचालक,तंत्र शिक्षण,म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.४अ/आस्था/कंत्राटी माहिती/२०१७/३८३,दि.०२/०५/२०१७.
०२.मा.संचालक,तंत्र शिक्षण,म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.४अ/आस्था/कंत्राटी माहिती/२०१७/४८०,दि.१३/०६/२०१७.

मा.न्यायालयाच्या आदेशानुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील आणि शासकीय तंत्रनिकेतनातील कंत्राटी अध्यापकांच्या सेवा शा.नि.क्र.न्यायाप्र२०१०/प्र.क्र.११०/२०१०(ब)/तांशि७,दि.१४/०१/२०१५,शा.नि.क्र.न्यायाप्र/२०१५/प्र.क्र.३४/२०१५/(भाग-४)/१/तांशि-७,दि.१३/०३/२०१५,शा.नि.क्र.न्यायाप्र/२०१५/प्र.क्र.३४/२०१५(भाग-४)/२/तांशि-७, दि.१३/०३/२०१५ व शा.नि.क्र.न्यायाप्र-२८१५/प्र.क्र.२६०/२०१५/तांशि-७,दि.२१/०३/२०१६ अन्वये नियमित करण्यात आलेल्या आहेत.

संबंधित चौकशी करीता कंत्राटी अधिव्याख्यात्यांची माहिती पडताळणीकरिता मा.चौकशी अधिकारी यांना दि.२६/०४/२०१७ व २७/०४/२०१७ रोजी तंत्रशिक्षण संचालनालय येथे सादर करण्यात आली होती.

सदरील दिवशी कागदपत्रांची तपासणी पूर्ण न झाल्याने मा.चौकशी अधिकारी यांनी सदरच्या चौकशीचे काम माहे जुलै-२०१७ च्या पहिल्या आठवडयात घेण्यात येईल असे कळविले आहे. तरी त्यानुसार आपणास कळविण्यात येते की, संदर चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ पत्र क्र.०१ च्या पत्रान्वये निर्देशित केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे अधिव्याख्यातानिहाय तयार ठेवावीत. तसेच आपणास असेही निर्देशित करण्यात येते की,आपल्या संस्थेतून अन्य संस्थेत बदली झालेल्या अध्यापकांची मूळ कागदपत्रे तंत्रशिक्षण संचालनालयास चौकशीच्या वेळी उपलब्ध करुन द्यावीत. जेणेकरुन चौकशी अधिका-यांना कागदपत्रे सादर करताना अध्यापकनिहाय कागदपत्रे सादर करणे सुलभ होईल.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत:-या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.